आधुनिक विचारांचे
# वर्तमान

बीड । रविवार, १५ ऑगस्ट २०२१ । वर्ष : ३ | आपले वृत्तपत्र, आपला आवाज | पुरवणी विशेषांक । पाने : ६ । मूल्य २ ₹

७५ व्या स्वातंत्र्यदिनाच्या
सर्व वाचकांना
हार्दिक शुभेच्छा!

विशेष संपादकीय

## 'वर्तमान'चे सिंहावलोकन



'आपले वृत्तपत्र, आपला आवाज' हे ब्रीद घेवून बीड जिल्ह्याच्या पत्रकारितेत गेल्या ३ वर्षांपासून आधुनिक विचारांचे वर्तमान ताठ मानेने उभा आहे. तो वाचक, जाहिरातदार आणि हितचिंतकांच्या जोरावर खरंतर बीड जिल्ह्याला पत्रकारितेची उज्वल आणि प्रदीर्घ अशी परंपरा लाभलेली आहे. अशा या बीड जिल्ह्यात आधुनिक विचारांचे वर्तमानने सकारात्मक आणि विकासात्मक पत्रकारितेचा धर्म पाळलेला आहे. यापुढेही सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून पुढे जात राहू ही वर्धापन दिनानिमित्त ग्वाही देत आहोत. वृत्तपत्रांच्या भाऊगर्दीतही वर्तमानने वेगळे अस्तित्व निर्माण केले आहे. जिल्ह्यातील प्रामुख्याने माजलगाव मतदारसंघातील अनेक सामाजिक विषय पोटतिडकीने मांडण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. त्यातून अनेक विषयांना न्याय देवू शकलो. याचा सार्थ अभिमान वाटतो. सत्य मांडताना कुणाचीही भीड न ठेवता बातमीशी प्रामाणिक राहून वर्तमान पुढे वाटचाल करत आहे. या वाटचालीत अनेकांचा सहयोग लाभलेला आहे. जाहिरात हा कोणत्याही वृत्तपत्राचा प्राण असतो. छोटी-छोटी वृत्तपत्रे टिकून धरण्यात स्थानिक जाहिरातदारांचे अमूल्य योगदान असते. याची जाणीव आम्हाला आहे. भांडवलदारी वृत्तपत्राच्या तुलनेत आमच्यासारखी अनेक वृत्तपत्रे तग धरून आहेत. त्याचे श्रेय मायबाप वाचकांना दिले पाहिजेत. घेतलेला वसा टाकायचा नाही, या भावनेतून वर्तमानची वाटचाल सुरू आहे. ती पुढेही सुरूच राहील. वर्तमानवर प्रेम करणाऱ्या सर्वांचे या वर्धापन दिनानिमित्त ऋण व्यक्त करताना वर्तमानवर असेच प्रेम रहावे ही आशा!

: संपादक

# निर्बंधांचा लगाम हटविला

## आजपासून सर्व दुकाने खुली राहणार; वीकेंड लॉकडाऊनमध्ये शिथीलता

▶ प्रतिनिधी

बीड : नवे जिल्हाधिकारी राधाबिनोद शर्मा यांनी रात्री उशिरा आदेश जारी करून वीकेंड लॉकडाऊनसह सर्व निर्बंधांमध्ये शिथीलता आणली आहे. दरम्यान, यापुढे बीड जिल्ह्यातील सर्व दुकाने रात्री १० वाजेपर्यंत खुली राहतील, असे आदेशात नमूद करण्यात आलेले आहे. निर्बंधामध्ये जरी शिथीलता आणली असली तरी कोरोनाबाबतचे नियम प्रत्येकाने पाळवेत असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

बीड जिल्ह्यातील सर्व दुकाने रात्री १० वाजेपर्यंत खुले करण्यास जिल्हाधिकारी राधाबिनोद शर्मा यांनी आदेश रात्री त्यांनी काढले आहेत. यात उपहारगृहे, बार, दुकाने शॉपिंग मॉल, जिम्नॅशिअम, योगा सेंटर, सलून-स्पा, विवाह सोहळे याबाबत देखिल नव्याने आदेश काढण्यात आले आहेत. राज्यातील ११ जिल्ह्यातील कोरोना रूग्णसंख्या अधिक असल्याने शासनाने याबाबत निर्णय न घेता निर्बंध कायम ठेवले होते, मात्र शनिवारी रात्री बीडचे जिल्हाधिकारी राधाबिनोद शर्मा यांनी नव्याने आदेश काढले आहेत. बीड जिल्ह्यातील सर्व दुकाने हे रात्री १० वाजेपर्यंत सुरू ठेवण्यात येतील. मात्र त्यासाठी दुकान मालक आणि दुकानात काम करणारे कामगार यांच्या कोरोना



प्रतिबंधात्मक लसींच्या दोन्ही मात्रा पूर्ण झालेल्या असाव्यात, तसेच दुकानात निर्जतुकीकरण केलेले असावे असे म्हटले आहे. हॉटेल, बार, रेस्टॉरंट ५० टक्के क्षमतेने सुरू ठेवण्यात यावेत, तसेच विवाह सोहोळ्यासाठी जास्तीत जास्त २०० जणांची उपस्थिती मान्य असेल. राज्यात कोविड-१९ ची दुसरी लाट आटोक्यात येत आहे. परंतु अद्यापही कोविड रूग्ण आढळून येत असल्याने राज्यात कोविड प्रतिबंधक उपाययोजना करण्याची आवश्यकता भासत आहे. बीड जिल्ह्यातील सिनेमागृह, नाट्यगृह, मल्टिप्लेक्स (स्वतंत्र तसेच शॉपिंग मॉलमधील) पुढील आदेशापर्यंत बंदच राहतील. जिल्ह्यातील सर्व धार्मिक स्थळे पुढील आदेशापर्यंत नागरिकांसाठी बंद राहतील. ज्या नागरिकांचे कोविड प्रतिबंधात्मक लसीकरण पूर्ण झाले आहे. त्या नागरिकांना, बाहेरच्या राज्यातून महाराष्ट्र राज्यात प्रवेश करण्यासाठी आरटीपीसीआर चाचणीची आवश्यकता नसेल. अन्य प्रवाशांसाठी ७२ तासांपूर्वीची आरटीपीसीआर चाचणी निगेटीव्ह किंवा १४ दिवस विलगीकरण आवश्यक राहील. कोविड प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून राज्यात गर्दी व्यवस्थापन करण्याबाबत केंद्र शासनाने तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाने निर्देशित केले आहे. यास्तव गर्दी, जमाव टाळण्यासाठी वाढदिवस, राजकीय, धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रम, निवडणूक प्रचार सभा, रॅली, मोर्चेवरील निर्बंध कायम राहतील.









## संपादकीय

# निर्बंधात शिथिलता, सतर्कता हवी

कोरोना दुसऱ्या लाटेनंतर जनजीवन पूर्णतः बदललेले आहे. कोरोनाची आकडेवारी जरी कमी असली तरी याबाबत गाफिल अजिबात राहू नये. राज्यात गेल्या दीड वर्षांहून अधिक काळ कोरोना महामारीने सगळ्यांचेच जगणे हराम करून सोडले आहे. कोरोना रूग्णांची संख्या कधी कमी, तर कधी अचानक वाढत असल्याने या अस्थिर परिस्थितीचा फटका बसण्याची शक्यता लक्षात घेऊन सरकारला, प्रशासनाला कोणताही ठोस निर्णय घेणे शक्य होत नव्हते. आता कोरोनाच्या दुसऱ्या लाटेची तीव्रता बऱ्याच अंशी घटल्याचे दिसत असल्यामुळे राज्यात 'मिशन बिगीन अगेन'च्या संकल्पनेनुसार कोरोना निर्बंधात थोडीबहुत शिथिलता देण्यात आली आहे. मात्र हे करताना यावेळी सरकारने सरसकट सर्वांना सूट न देता ज्यांनी कोरोना लसीचे दोन डोस घेतले आहेत, अशाच नागरिकांना प्राधान्य देण्याची एक खेळी केली आहे. जेणेकरून लोकांमध्ये लस घेण्याबाबत जागरूकता, उत्सुकता निर्माण होईल आणि राज्यात सरसकट सर्व नागरिकांचे लसीकरण करण्याचे ध्येय गाठता येईल, असा सरकारचा होरा असावा. राज्यात रेस्टॉरंट आणि हॉटेल सध्या सायंकाळी ४ वाजेपर्यंत सुरू होते, ते मात्र आता १५ ऑगस्टपासून रात्री १० वाजेपर्यंत सुरू ठेवण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. तसेच मॉल्सही सुरू करण्यात आले असून तेही रात्री १० वाजेपर्यंत खुले असतील. मात्र, केवळ लसींचे दोन डोस घेतलेल्या नागरिकांनाच मॉलमध्ये प्रवेश देण्यात येणार आहे. त्यामुळे लोकल प्रवास, मॉलमध्ये प्रवेश या सुविधेचा पुरेपूर लाभ सर्वांना घेता येणे शक्य होणार नाही. म्हणजेच निर्बंध शिथिल झाले असले तरी 'कही खुशी, कही गम' अशी परिस्थिती सध्या जाणवत आहे. कारण दोन लस घेतलेल्यांचे प्रमाण फार कमी असल्याने सरकारच्या या निर्णयाचा लाभ सर्वांना घेता येणे शक्य होणार नाही. कोरोनाच्या तिसऱ्या लाटेचा धोका कायम असल्याने निर्बंधांमध्ये शिथलता दिली जात असली तरी जबाबदारी मात्र वाढलेली आहे. मास्क, सुरक्षित अंतर, हात धुणे या त्रिसूत्रीचे सर्वांनीच पालन करणे आवश्यक आहे. दुसऱ्या लाटेच्या वेळी ऑक्सिजन तुटवड्यामुळे केवळ राज्यातच नव्हे, तर देशासमोर मोठे आव्हान उभे राहिले होते. म्हणूनच राज्यातील कोविड रूग्णांसाठी दररोज ७०० मेट्रिक टन ऑक्सिजनची गरज भासू लागल्यास त्यावेळी लगेच निर्णय घेत राज्यात पुन्हा लॉकडाऊन लावण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला आहे. राज्याची ऑक्सिजन उत्पादन क्षमता मर्यादित असून दररोज केवळ १३०० मेट्रिक टन ऑक्सिजन उत्पादन केले जाते. दुसऱ्या लाटेत ऑक्सिजनची गरजही खूप वाढली होती. त्यामुळे सुमारे ५०० मेट्रिक टन ऑक्सिजन अतिशय प्रयत्नपूर्वक इतर राज्यांतून आणावा लागला होता. गेल्या पावणेदोन वर्षांत कोविड महामारीने खूप काही शिकवले आहे. कोरोनाचा डेल्टा अवतार आपल्या आजूबाजूच्या देशांमध्ये तसेच अमेरिका, ब्रिटनमध्येसुद्धा मोठ्या प्रमाणावर पसरतो आहे. अशा परिस्थितीत आपल्यालाही सगळ्या बाबतीत अतिशय काळजीपूर्वक व्यवहार खुले करावे लागत आहेत. विशेष म्हणजे लसीचे दोन डोस घेतलेल्या मुंबईकरांना लोकल प्रवासाची परवानगी देण्याची प्रक्रिया किचकट करून राज्य सरकारने मुंबईकरांची नाहक कोंडी केली आहे. मुख्यमंत्र्यांनी लोकल प्रवासाला परवानगी देण्याचा निर्णय घेतला असला तरी नियम आणि अटींचा गुंता करून सोपा प्रश्न अवघड करून ठेवला आहे. प्रत्यक्षात सामान्यांना सहजपणे लोकल प्रवास करता येणार नाही, अशी व्यवस्था करून ठेवल्याचे दिसते. लोकलमधून कमीत कमी मुंबईकरांनी प्रवास करावा, अशीच सरकारची इच्छा दिसत आहे. लसीचे दोन डोस घेतलेल्या नागरिकांना लोकलमधून प्रवासाची मुभा द्यावी, अशी मागणी भाजपने सातत्याने केली होती आणि त्यासाठी भाजप कार्यकर्त्यांनी आंदोलनेही केली होती. या आंदोलनामुळे राज्य सरकारला जाग आली आणि १५ ऑगस्टपासून लसीचे दोन डोस घेतलेल्यांना लोकल प्रवास करण्याची परवानगी देण्यात आली. मात्र ही परवानगी मिळवण्यासाठी राज्य सरकारने सुरू केलेली प्रक्रिया अत्यंत किचकट आहे. त्यामुळेच पहिल्या दिवशी अवघ्या २० ते २२ हजार मुंबईकरांना परवानगी मिळवता आली. प्रवासाची परवानगी मिळवण्यासाठी राज्य सरकारने ज्या काही अटी घातल्या आहेत, त्या पाहता सर्व मुंबईकरांना लोकल प्रवासाची परवानगी केव्हा मिळणार? असा प्रश्न उभा ठाकला आहे. आधीच अनेक निर्बंधांनी वैतागलेल्या सामान्य मुंबईकरांची लोकल कोंडी करण्याचा डाव राज्य सरकारने टाकला आहे की काय, अशी शंका वाटण्यास वाव आहे. १५ ऑगस्टपासून अनेक निर्बंध शिथिल करण्यात आले असले तरी प्रार्थना स्थळांवरील, मंदिरांवरील निर्बंध कायम ठेवले आहेत. श्रावण महिन्याचे धार्मिक महत्त्व लक्षात घेऊन मंदिरांवरील निर्बंध उठविण्याची गरज होती. मात्र, हे निर्बंध कायम ठेवून आघाडी सरकारने आपल्याला हिंदूंच्या भावनांशी काही देणे-घेणे नसल्याचेच दाखवून दिले आहे. शासनाने घेतलेले निर्णय किती योग्य अयोग्य आहे हे येणारा काळच ठरवेल.

# 'सावध ऐका पुढच्या हाका'

**संयुक्त राष्ट्रसंघाने नुकताच एक रिपोर्ट जाहीर केलाय. जागतिक तापमानवाढ आणि हवामान बदलांवर भाष्य करणारा हा रिपोर्ट कार्बन उत्सर्जन, आणि जागतिक तापमानवाढीचे संकट अशा अनेक मुद्यांवर भाष्य करतोय. हे शतक संपायच्या आधी भारतातली १२ शहरे पाण्याखाली जातील असेही म्हटले आहे. त्यामुळे पुढची संकटे टाळायची तर या रिपोर्टकडे संकटांची चाहूल म्हणूनच बघायला हवे.**

पर्यावरण

**अक्षय शारदा शरद**

कोल्हापूर, सांगली, साताऱ्याला महापुरामुळे फटका बसला. कोकणामधल्या महाडच्या तळये गावात दरड कोसळून अनेक कुटुंबे ढिगाऱ्याखाली गाडली गेली. चिपळूण शहर पाण्याखाली गेले. हिमाचल प्रदेश, उत्तराखंड या राज्यांमधे दरड कोसळण्याच्या घटना वारंवार घडतायत. तिकडे चीनच्या हेन्नान भागात मागच्या हजार वर्षात पहिल्यांदा इतका पाऊस पडला की, घरच्या घरे उध्वस्त झाली. जगाला ऑक्सिजनचा २० टक्के वाटा देणारं अमेझॉनचे जंगल जाळले गेले होते. ब्राझीलमधले लोक मोठ्या प्रमाणात दुष्काळाला तोंड देत असल्याचे 'डाऊन टू अर्थ'चा एक रिपोर्ट सांगतोय. कॅनडा आणि अमेरिकेतल्या अनेक ठिकाणी उष्णता वाढल्यामुळे माणसांची काहिली होतेय. युरोपातल्या अनेक नद्या दुथडी भरून वाहतायत. त्यामुळे तिथे अनेक भागांमधे पुराची स्थिती निर्माण झालीय. हे सगळे अचानक होतेय का? आपण डोंगर पोखरले. नद्यांचे मार्ग बदलले. विकासाची स्वप्न प्रत्यक्षात उतरवत असताना निसर्गाला नख लावले. सध्या मुंबई-गोवा महामार्गाचे चौपदरीकरण सुरू आहे. ते करताना निसर्गाला ओरबाडल्याच्या 'खुणा' तिथल्या प्रवासात तुम्हाला जागोजागी दिसत राहतात. आतातर महापुराचा फटका बसल्यामुळे कोकण किनारपट्टीला संरक्षक भिंती उभ्या करायची भाषा केली जातेय. खरंतर निसर्ग आपले रौद्ररूप दाखवतोय. विकासाच्या भयानक कल्पना आपल्याला विनाशाकडे घेऊन जातायत. असे का होतेय त्याची कारणे आपल्याला शोधायची हवीत. हवामान बदल, तापमानवाढ हे त्याचे मूळ कारण आहे. या बदलांचा अभ्यास करणाऱ्या संयुक्त राष्ट्रसंघाच्या 'इंटरगवर्नमेंटल पॅनल ऑन क्लायमेट चेंज' अर्थात आयपीसीसीचा नुकताच एक रिपोर्ट आला आहे. 'क्लायमेट चेंज २०२१: द फिजिकल सायन्स बेसिस' असे त्याचे शीर्षक आहे.

पॅरिस कराराच्या मुळाशी आयपीसीसी

जागतिक हवामान संस्था आणि संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रम यांनी १९८८ ला आयपीसीसीची स्थापना केली होती. मागच्या काही वर्षांमधे हवामानाचे चक्र पुरते पालटले आहे. हवामान बदलांची चर्चा मागच्या दोनेक वर्षात सातत्याने कानावर पडतेय. त्यामुळेच अधूनमधून या प्रतिष्ठित संस्थेच्या वेगवेगळ्या रिपोर्टची चर्चाही होत राहते. आयपीसीसी ही जगभरातल्या शेकडो शास्त्रज्ञांची त्यासाठी निवड करते. वेगवेगळे रिपोर्ट, रिसर्चचा अभ्यास केला जातो. वाढणारी तापमानवाढ, हवामान बदल कसे रोखता येईल यावर शास्त्रज्ञ एकत्र येत विचारमंथन करतात. त्यातून बाहेर कसे पडायचे याचा अभ्यास केला जातो. त्यामुळेच पर्यावरण अभ्यासक, शास्त्रज्ञ, पर्यावरणाविषयी सातत्याने काम करणारे कार्यकर्ते यांच्यासाठी हा रिपोर्ट मार्गदर्शक ठरतो. हा रिपोर्ट आल्यावर संयुक्त राष्ट्रांच्या सदस्य देशांकडून त्याचे विश्लेषण केले जाते. याआधी २०१४ ला आयपीसीसीचा रिपोर्ट आला होता. २०१५ ला जागतिक तापमानवाढीसंबंधी पॅरिस करार झाला. यात वाढतं तापमान या शतकाच्या शेवटपर्यंत १.५ डिग्री सेल्सिअसवर ठेवायचा संकल्प करण्यात आला होता. या पॅरिस कराराच्या मुळाशी आयपीसीसीचा २०१४ चा रिपोर्ट होता. यावेळचा हा सहावा



रिपोर्ट आहे. ९ ऑगस्टला हा रिपोर्ट प्रकाशित करण्यात आला. जगभरातल्या १९५ देशांनी त्याला मंजुरीही दिलीय. २००७ ला संस्थेला नोबेल शांतता पुरस्कार मिळाला होता. यावरून संस्थेचे महत्व कितीय याचा अंदाज बांधता येईल. त्यामुळेच या रिपोर्टमधल्या मुद्यांकडे गांभीर्याने पहायला हवे.

असे वाढतेय जागतिक तापमान

आजकाल हिवाळा, पावसाळ्यातही उष्णतेमुळे हैराण व्हायला होते. येणाऱ्या २० ते ३० वर्षांमध्ये म्हणजेच २०५० पर्यंत याचे प्रमाण अधिक वाढेल. असे आयपीसीसीचा रिपोर्ट म्हणतोय. मागच्या ४ दक्षकांमधे जागतिक तापमानवाढीत सातत्याने वाढ होतेय. २००१ ते २०२० मधे १८५० ते १९०९ च्या तुलनेत तापमान ०.९९ डिग्रीने वाढलेय. मागचे दशक गेल्या १.२५ लाख वर्षातले सगळ्यात उष्ण राहिले आहे. सध्या जागतिक तापमानवाढ १.५ डिग्रीवर राहणे नॉर्मल समजले जातेय. पुढचे २० ते ३० वर्षांमधे ही परिस्थिती कायम राहिली तर जागतिक तापमानवाढ २ डिग्री सेल्सिअसवर पोचेल. हवेतली पाण्याची वाफ, कार्बन डायॉक्साईड, मिथेन आणि इतर गॅसमुळे पृथ्वीच्या भूपृष्ठाचं आणि वातावरणाचे तापमान वाढते. त्यातून जो गॅस तयार होतो त्याला ग्रीनहाऊस गॅस असे म्हणतात. आयपीसीसीच्या रिपोर्टमधे १७५० पासून ग्रीनहाऊस गॅसमधे सातत्याने वाढ होत असल्याचे निरीक्षण नोंदवले गेलेय. मानवी हस्तक्षेप हे त्यामागचे मोठे कारण आहे. २०११ पासून वातावरणात असे मोठे बदल होतायत. दुसरीकडे कार्बन डायॉक्साईडच्या वार्षिक सरासरी दरात वाढ होतेय. मागच्या ६० वर्षांमधे कार्बन डायॉक्साईडचे उत्सर्जन ५६ टक्क्यांनी वाढले आहे.

शून्य कार्बन उत्सर्जनाचे काय?

जीवाश्म इंधन, गाड्या, कारखाने यांपासून तयार होणाऱ्या ग्रीनहाऊस गॅसचे उत्सर्जन जे मानवनिर्मित आहे त्याला शून्यावर आणल्यामुळे जागतिक तापमान स्थिर राहते असे म्हटले जातेय. १०० देशांनी २०५० पर्यंत कार्बन उत्सर्जन शून्यावर आणायचा संकल्प केला होता. यात अमेरिका, चीनसोबत युरोपियन देशांचा समावेश होता. भारत हा चीन आणि अमेरिकेनंतर कार्बन उत्सर्जन करणारा जगातला तिसरा मोठा देश आहे. चीन १० अमेरिका ५ आणि भारत २.६ गिगाटन इतक्या कार्बन डायॉक्साईडचे उत्सर्जन करतो. त्याचाच परिणाम देशातल्या सध्याच्या नैसर्गिक आपत्तींकडे पहायला हवे. २०३० पर्यंत आपण चीनच्या एक तृतीयांश इतक्या कार्बन डायॉक्साईडचं उत्सर्जन करत असू.

हवामान बदलांचा परिणाम

१९०१ ते १९७१ तुलनेत समुद्राच्या पातळीत तीन टक्क्यांनी वाढ झालीय. अंटार्क्टिका हा इतर खंडांपेक्षा अधिक थंड, कोरडा आणि जास्त वारे वाहणारा समजला जातो. त्यामुळे इथे उष्णतेचे प्रमाण वाढायला लागलेय. बर्फ वितळतोय. मागच्या १ हजार वर्षांमधला आताचा अंटार्क्टिकावरचा बर्फ हा सगळ्यात कमी असल्याचे आयपीसीसीने म्हटले आहे. उष्णता वाढतेय. त्यामुळे हिमनद्याही वितळायला लागल्यात. त्याचा हिमालयासोबतच जगभरातल्या पर्वतरांगावर परिणाम होतोय. ही काळजीची गोष्ट आहे कारण हिमनद्या, बर्फ वितळणे यामुळे थेट पाणी, पावसाचे चक्र बदलते. पूर येणे, पाणीटंचाई निर्माण होणे अशा गोष्टी घडू घडतायत. केवळ तापमानवाढीपर्यंत हे मर्यादित राहणार नसल्याचे आयपीसीसीच्या शास्त्रज्ञांचे म्हणणे आहे. समुद्री जीव, वनस्पती यांना मिळणाऱ्या ऑक्सिजनवरही त्याचा परिणाम होतोय. त्यामुळे सातत्याने ऋतूचक्र बदलते. उष्काळाची परिस्थिती निर्माण होते.

भारतातली शहरं बुडण्याचा धोका

'यास,' 'तौक्ते', 'निसर्ग' चक्रीवादळांनी आपल्याला फटका दिला. हिमालय, उत्तराखंडमधे दरडी कोसळण्याच्या बातम्या येतायत. अशातच महाराष्ट्रातल्या पश्चिम महाराष्ट्र, कोकणात महापुरामुळे होत्याचे नव्हते झाले आहे. भर पावसाळ्यात मुंबईची 'तुंबई' पाहताना मुंबईकर त्रासून जातात. पण या सगळ्याच्या मुळाशी कोण जाते आहे? दक्षिण आशियायी देशांमधे या शतकात मोठ्या प्रमाणात उष्णता वाढेल तसेच मुसळधार पाऊस पडेल. वाढत्या शहरीकरणामुळे झाडांच्या कत्तली केल्या जातायत. त्याचा परिणाम म्हणून भारतात पुराच्या घटनांमधे वाढ होतेय. बंगालचा उपसागर आणि अरबी समुद्रातले तापमानही वाढतेय. २१ व्या शतकात भारतातली १२ शहरे ही पाण्यामधे बुडालेली असतील असे हा रिपोर्ट म्हणतोय. यात मुंबई, चेन्नई, कोलकाता, विशाखापट्टणम अशा शहरांचा समावेश आहे. यातून वाचायचे तर पर्यायी मार्ग शोधावे लागतील. अशी घर उभी करावी लागतील जी उष्णतेपासून वाचवू शकतील. असे ऊर्जेचे स्रोत तयार करावे लागतील जे लोकांच्या आवाक्यात असतील.

आता जबाबदारी विकसित देशांची

योग्य पावले उचलली नाहीत तर अनर्थ अटळ आहे. ही पावले म्हणजे नेमके काय? तर विकसित देशांनी शहाणे होणे. या देशांना फटका बसेल पण पैसा आणि विज्ञानाच्या जोरावर ते यातून आपली सुटका करायचा प्रयत्न करतील. मार्ग शोधतील. यात होरपळून निघतील ते जगभरातले गरीब देश. त्यामुळेच विकसित आणि श्रीमंत देशांनी पर्यावरणाला अनुकूल आर्थिक धोरणे बनवायची गरज आहे. जर २०३० पर्यंत आपण कार्बन उत्सर्जन अर्ध्यावर आणि २०५० पर्यंत ते शून्यावर आणू शकलो तर ही तापमानवाढ आपल्याला रोखता येऊ शकेल. त्यामुळे ऊर्जेच्या नव्या पर्यायांचा विचार करावा लागेल. तंत्रज्ञानही आपल्या सोबत आहे. जगभरातल्या सरकारांनी मनावर घेतले तरच हे होऊ शकते. त्यांची इच्छाशक्ती हाच या संकटातून बाहेर पडण्याचा सध्यातरी एकमेव मार्ग आहे.

यूएन म्हणतेय शेवटचा इशारा

आयपीसीसीच्या वर्किंग कमिटीने हा रिपोर्ट धडकी भरवणारा असल्याचे म्हटले आहे. तर संयुक्त राष्ट्रसंघ अर्थात यूएनचे सरचिटणीस अँटीनियो गुटेरेस यांनीही या संदर्भात एक विस्तृत निवेदन केले आहे. हा रिपोर्ट म्हणजे मानवतेसाठी धोक्याची घंटा असल्याचे त्यांनी म्हटले आहे. 'जीवाश्म इंधनामुळे उत्सर्जन होणारा ग्रीनहाऊस गॅस, वृक्षतोडीमुळे जगाचा श्वास कोंडतोय. एका धोकादायक संकटाच्या आपण जवळ पोचलो आहोत. या जागतिक तापमानवाढीला माणसेच जबाबदार असल्याचा निष्कर्ष हा रिपोर्ट देतोय. आपण पर्यावरणाचे फार नुकसान केलेय. त्यामुळे नैसर्गिक आपत्ती, ढगफुटीसारख्या घटना वारंवार घडतायत.' असे गुटेरेश यांचे म्हणणे आहे. पर्यावरणवादी कार्यकर्ता असलेल्या ग्रेटा थुनबर्गने एक ट्विट करत ही आणीबाणीची स्थिती असल्याचे म्हटलेय. पण 'हजारो रिपोर्ट आणि रिसर्चमधून ही गोष्ट आपण ऐकत आलो आहोत त्यामुळे यात नवे काहीच नाहीय. त्यामुळे संकट संकट म्हणून हाताळायला हवे.' असेही तिने आपल्या ट्विटमधे म्हटलेय.

लक्ष ग्लॅस्कोतल्या हवामान परिषदेकडे

इंग्लंडच्या नेतृत्वात नोव्हेंबर २०२१ ला स्कॉटलँडच्या ग्लॅस्कोत 'संयुक्त राष्ट्र हवामान बदल परिषद' होतेय. यात जगभरातले जवळपास १९६ देश सहभागी होतील. तिथे आयपीसीसीच्या या रिपोर्टची हवामान बदलांच्या अनुषंगाने चर्चा होईल. त्यातूनच पुढचा मार्ग सापडू शकेल. या परिषदेत काही कठोर निर्णयही या देशांना एकमताने घ्यावे लागतील. या परिषेदेत २०१५ च्या हवामान बदलांविषयीच्या पॅरिस कराराच्या यशापयशावरही विचार होईल. तसेच जंगलाच्या कत्तली करणाऱ्यांना कठोर शिक्षा, इलेक्ट्रिक वाहन वापरायला प्रोत्साहन देणे, कोळशाच्या वापरावर निर्बंध अशा काही महत्वाच्या मुद्यांवरही या परिषदेत विचारमंथन होईल असे पर्यावरण तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

# कोरोना लस : समज, गैरसमज

**देशात कोरोनाच्या रूग्णांची संख्या पुन्हा एकदा वाढू लागलीय. यावेळी पेशंटमधे लसीचे दोन्ही डोस घेतलेल्या काही लोकांचाही समावेश आहे. लसीचे डोस घेतलेल्यांना कोविडची लागण ही फक्त भारतातच नव्हे तर जगभरात होतेय. त्यामुळेच लस घेऊनही कोरोना होत असेल तर लस घ्यायचीच कशाला असी मानसिकता तयार होताना दिसतेय. या प्रश्नात थोडेफार तथ्यही आहे आणि लोकांचा लसीबद्दलचा गैरसमजही आहे.**

विशेष

**डॉ.नानासाहेब थोरात**

सध्या भारतात कोरोना वायरसवरच्या लसीचे दोन्ही डोस घेतलेल्या लोकांची संख्या वेगाने वाढतेय. त्याचबरोबर लसीचे दोन्ही डोस घेऊनही कोविड होत असल्याच्या बातम्याही येतायत. त्यामुळे अर्थातच संभ्रमाची स्थिती निर्माण झालीय. लसीचे दोन्ही डोस घेऊनही कोविड होत असेल तर मग लस घ्यायचीच कशाला, असा प्रश्न अनेकांकडून उपस्थित केला जातोय. या प्रश्नात थोडंफार तथ्यही आहे आणि लोकांचा लसीबद्दलचा गैरसमजही आहे. दुर्दैवाने मागच्या वेळेसारखीच लोकांमधे लस न घेण्याची मानसिकता तयार होतेय. या पार्श्वभूमीवर नक्की दोन्ही डोस घेऊनसुद्धा कोविड का होतोय, याच्या खोलात जाऊन पाहण्याची गरज आहे.

लसीच्या प्रमाणिकतेचे प्रमाण

आजच्या जागतिक परिस्थितीचा विचार केला तर असं दिसून येतं की, लसीकरणाचे दोन्ही डोस घेतल्यानंतरही कोविडचा संसर्ग झालेल्या पेशंटमधे आजाराची गंभीर लक्षणं निर्माण झाली नाहीत. हॉस्पिटलमधे दाखल करण्याची तर बिलकुल गरज पडली नाही. पण केरळ आणि महाराष्ट्रातल्या एक किंवा दोन्ही डोस घेतलेल्या काही पेशंटना हॉस्पिटलात दाखल करण्याची गरज पडतेय. असं कशामुळे होतंय हा प्रश्न सर्वांना कोड्यात टाकतोय. यामागची काही कारणं समजून घेऊयात. पहिलं म्हणजे लसींची परिणामकारकता.




जगातल्या वेगवेगळ्या लसी लसीकरणासाठी प्रमाणित केल्या गेल्या तेव्हा सगळ्याच कंपन्यांनी त्यांची परिणामकारकता जाहीर केली होती. भारतात सध्या वितरित असलेल्या ऑक्सफर्ड विद्यापीठानं शोधलेल्या कोविशिल्डच्या दोन्ही डोसनंतरची परिणामकारकता ही सुमारे ६५ ते ७० टक्क्यांच्या आसपास आहे. तर रशियन स्पुटनिक-वीची परिणामकारकता ही ९० टक्क्यांच्या आसपास आहे. तिसर्या कोवॅक्सिन लसीची नक्की परिणामकारकता अजून समजलेली नाही. याचाच अर्थ असा होतो की १०० लोकांनी जर कोविशिल्ड लस घेतली तर ७० लोकांना कोविड होणार नाही. तेच प्रमाण स्पुटनिक-व्हीसाठी ९० असेल. म्हणजेच कोविशिल्ड लस घेतली तर ३० लोकांना कोविड आणि स्पुटनिक-व्ही लस घेतली तर १० लोकांना कोविड होण्याची शक्यता आहे. पण, लस घेऊनही या लोकांना कोविड झाला तरी त्यांना वर सांगितल्याप्रमाणे कोविडची गंभीर लक्षणं निर्माण होणार नाहीत आणि त्यांना हॉस्पिटलात दाखल करण्याची गरज पडत नाही.

वेरियंटचा धुमाकूळ

दुसरं कारण म्हणजे कोरोना वायरसचे येणारे नवनवीन स्ट्रेन्स. आतापर्यंत मूळ वायरसचे पाचपेक्षा अधिक स्ट्रेन्स जगभरात कोविडचा हाहाकार घालताना दिसून आलेत. आता दिल्या जाणार्या सगळ्याच लसी या मार्च-एप्रिल २०२० मधे विकसित करण्यात आल्यात आणि या सर्वच लसी कोरोनाच्या मूळ स्ट्रेन्सवर प्रभावी ठरतील अशा प्रकारे विकसित केल्यात. दुर्दैवाने कोरोनाचे नवीन स्ट्रेन्स अतिशय वेगाने निर्माण झाले. याचबरोबर काही नवीन वेरियंट आता लसीमुळे तयार होणार्या अँटिबॉडीजपासून स्वतःला वाचवू शकतायत किंवा लसीमुळे तयार झालेल्या प्रतिकारशक्तीला फसवत आहेत, असं सांगणारेही काही अहवाल समोर आलेत. काही लोकांना दोन्ही डोस घेऊनही पुन्हा कोविड होतोय. यामागे नवीन तयार झालेले स्ट्रेन्स किंवा वेरियंटही तेवढेच कारणीभूत आहेत का याचा मात्र अभ्यास अजून समोर आला नाही. याचबरोबर वायरसच्या बदललेल्या प्रकाराविरुद्ध नवी लस तयार करावी लागेल, असाही एक मतप्रवाह आहे. सध्या तरी सगळ्याच कंपन्या या शक्यता फेटाळून लावतायत. त्याचबरोबर म्हाताऱ्यांना लसीचा तिसरा डोस द्यावा का, याच्याही शक्यता पडताळून पाहिल्या जातायत. किंवा दोन वेगवेगळ्या कंपनींच्या लसी देऊन यावर उपाय शोधता येईल याबाबतही संशोधनपर चाचपणी सुरूय.

जागतिक परिस्थिती काय सांगते?

लसीचे दोन्ही डोस घेऊनही कोविड होण्याचा प्रकार फक्त (पान ३ वर)

# नगर-बीड-परळी रेल्वेमार्गाला गती द्या

## खासदार डॉ.प्रितम मुंडे यांची रेल्वेमंत्र्यांशी चर्चा

▶ प्रतिनिधी

दिल्ली : केंद्रीय रेल्वे मंत्रालयाचा पदभार सांभाळणारे नवनियुक्त मंत्री अश्विनीकुमार वैष्णव यांची खासदार डॉ.प्रितम मुंडे यांनी दिल्ली येथे भेट घेतली. नगर-बीड-परळी रेल्वेमार्गाविषयी चर्चा करून प्रकल्पाला गती देण्याची मागणी यावेळी खासदार प्रितम मुंडे यांनी त्यांच्याकडे केली.



नगर-बीड-परळी रेल्वे प्रकल्पाच्या कामासाठी आवश्यक असलेला राज्य सरकारच्या वाट्याचा निधी मिळत नसल्याने प्रकल्पावर विपरीत परिणाम होत असल्याचे खासदार डॉ.प्रितम मुंडे यांनी निदर्शनास आणून देताना प्रकल्प जलदगतीने पूर्ण करण्यासाठी केंद्रीय स्तरावर रेल्वे विभागाची बैठक घ्यावी व यासंदर्भात संबंधितांना सूचना कराव्यात अशी मागणी केली. केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनीकुमार वैष्णव यांनी याविषयी सकारात्मक प्रतिसाद देताना प्रकल्पासाठी संबंधितांना सूचना देणार असल्याचे सांगितले. या भेटीमुळे नगर-बीड-परळी रेल्वेमार्गाच्या कामाला निश्चित गती मिळेल, असा विश्वास यावेळी खासदार डॉ.प्रितम मुंडे यांनी व्यक्त केला.



# आमदार प्रकाश सोळंकेंनी क्रीडांगणाचा शब्द पाळला

▶ प्रतिनिधी

माजलगाव : गेल्या विधानसभा निवडणुकीच्या काळात माजलगाव क्रीडा असोसिएशनने आमदार प्रकाश सोळंके यांना क्रीडा संकुलनाबाबत मागणी केली होती. या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत आ. प्रकाश सोळंके यांनी भव्य क्रीडा संकुल उभारण्याचे आश्वासन दिले होते व वेळोवेळी मागणी संदर्भात भेटी घेऊन असोसिएशनचे अध्यक्ष गोविंद टाकणखार, सलिम शेख यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सर्व असोसिएश नचे सदस्य यांनी पाठपुरावा केला.

प्रकाश सोळंके यांनी आमदार होताच ४ महिन्यात दिलेला शब्द पाळला व शहरालगत केसापुरी कॅम्प येथे भव्य क्रीडा संकुलाकरिता ११ एक्कर जागा मंजूर करून दिली व वर्षभरात क्रिडा संकुलासाठी ५ कोटी रूपयांचा निधी आणला.

माजलगाव शहरासह तालुक्यातील क्रीडाप्रेमींसाठी गरजेचे असलेले क्रीडा संकुल उभारण्याचे काम ते करत आहेत. माजलगाव क्रिडा असोसिएशनने विधानसभा निवडणुकीच्या काळात क्रीडा संकुल उभारण्याची मागणी प्रकाश सोळंके यांना केली होती. असोसिएशनने आमदार झाल्यावर भव्य क्रिडा संकुल बांधावे व शहरातील व माजलगाव तालुक्यातील सर्व क्रिडा प्रेमीची इच्छा पूर्ण करावी असे निवेदन देण्यात आले होते. याची पूर्तता झाल्याचा आनंद संघटनेने व्यक्त केला. यावेळी माजलगाव तालुक्यातील गुणवान खेळाडूंना राज्य, राष्ट्रीय स्तरावर प्रतिनिधीत्व करण्याची संधी मिळावी याकरिता प्रयत्न करणार असल्याचे सोळंके म्हणाले.

शेख फेरोज, सलिम शेख, विनोद गायकवाड, सचिन कोकाटे, संदीप जावळे यांची उपस्थिती होती.

# सुंदरराव सोळंके कारखान्याचे विक्रमी गाळपाचे उद्दिष्ट

## वार्षिक सर्वसाधारण सभेत आमदार प्रकाश सोळंके यांची माहिती

▶ प्रतिनिधी

माजलगाव : तेलगाव येथील लोकनेते सुंदरराव सोळंके सहकारी कारखाना परिसरात ३५ लाख मेट्रीक टन ऊस उपलब्ध असून सोळंके सहकारी साखर कारखाना १२ लाख मेट्रीक टन ऊसाचे गाळप करणार असल्याची माहिती आमदार प्रकाश सोळंके यांनी दिली. सुंदरराव सोळंके कारखान्याची २०२०-२१ या आर्थिक वर्षाची वार्षिक सर्वसाधारण सभा कारखान्याचे अध्यक्ष धैर्यशील सोळंके यांच्या अध्यक्षतेखाली गुरूवारी ऑनलाइन पध्दतीने पार पडली. यावेळी ते बोलत होते.




आमदार प्रकाश सोळंके म्हणाले की, कोविडमुळे संस्थेची वार्षिक सभा मागील दोन वर्षांपासून ऑनलाइन होत आहे. कोरोनाच्या या संकटाशी सामना करत मागील हंगाम यशस्वी केला आहे. ८ लाख २१ हजार मेट्रीक टन उसाचे गाळप करून ५.५ कोटी युनिट वीज निर्यात केली आहे. याचबरोबर आसवनी प्रकल्पातून सिरप बी.हेवी सी मोलासेसपासून रिफाईंड स्पिरीट आणि इथेनॉलचे उत्पादन घेतले आहे. पाऊस समाधानकारक झालेला असल्याने पुढील हंगामासाठी कार्यक्षेत्रात जवळपास ३५ लाख मेट्रीक टन ऊस गळितासाठी उपलब्ध होणे अपेक्षित आहे. कारखान्याने पुढील हंगामात १२ लाख मेट्रीक टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट ठेवले असून इथेनॉल प्रकल्पाच्या विस्तारीकरणाचे काम सुरू आहे.

या प्रकल्पामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांना जादा भाव देण्यास मदत होणार आहे. कारखान्याकडील ऑक्सिजन निर्मितीचा प्रकल्प दहा ते बारा दिवसांत पूर्ण होणार असल्याचेही त्यांनी सांगितले. प्रास्ताविक संचालक प्रकाश शिंदे यांनी केले. यावेळी कार्यकारी संचालक एम.डी.घोरपडे व खातेप्रमुख उपस्थित होते.

# उपसभापतीपदी महादेव तोंडे

▶ प्रतिनिधी



धारूर : येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उपसभापती पदाच्या अटीतटीच्या निवडणुकीत भाजपाचे महादेव तोंडे बहुमताने विजयी झाले. विजयासाठी रमेशराव आडसकर, राजाभाऊ मुंडे हे येथे ठाण मांडून बसले होते. बाजार समिती भाज पाचे ताब्यात ठेवण्यात त्यांना यश आले. त्यानुसार रमेशराव आडसकर, राजाभाऊ मुंडे यांनी सभापती निवडीणुकीत यश मिळवले.





# जमिनीचा मावेजा मिळेना

## संगम येथील कोल्हे कुटुंबीय स्वातंत्र्यदिनी उपोषण करणार

▶ प्रतिनिधी

माजलगाव : धारूर तालुक्यातील मौजे संगम येथील सर्व्हे क्रमांक १४१ मधील जमिनीचा मावेजा मिळत नसल्याने येथील कोल्हे कुटुंबीय मुलाबाळांसह १५ ऑगस्ट रोजी सकाळी ७ वाजता उपविभागीय अधिकारी कार्यालय माजलगाव येथे आमरण उपोषणास बसणार आहे. याबाबतचे निवेदन उपविभागीय अधिकारी कार्यालयाला ११ ऑगस्ट रोजी देण्यात आले आहे.

मौजे संगम येथील बालासाहेब अंबादास कोल्हे, संगीता रामा कोल्हे, अंगद रामा कोल्हे, शशिकला दामू कोल्हे, दीपक दामू कोल्हे, लक्ष्मण दामू कोल्हे आणि उत्तम रंभाजी कोल्हे हे मुलाबाळांसह आमरण उपोषण करणार आहेत. उपविभागीय कार्यालयात दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, शासनाने मौजे संगम ता.धारूर येथील पाझर तलावासाठी सर्व्हे क्रमांक १४१ क्षेत्र २ हेक्टर ९० आर जमीन संपादन केली. त्या जमिनीचा वाढीव मावेजा मिळावा म्हणून कोल्हे कुटुंबीयांनी दावा दाखल केला होता. त्या दाव्याचा निकाल ८ फेब्रुवारी २०१७ रोजी लागला असून प्रति गुंठा २००० रूपये मावेजा रक्कम न्यायालयाने वाढवून दिली. मावेजा रक्कम संदर्भात उपविभागीय अधिकारी कार्यालयाकडून २०१७ पाहून आजपर्यंत टोलवाटोलवीची उत्तरे मिळाली. उपविभागीय कार्यालयाने मावेजा संदर्भात अद्याप शासनाकडे निधी मागणीचा प्रस्ताव सादर केलेला नाही. त्यामुळे आम्ही संपूर्ण कुटुंबीय १५ ऑगस्ट रोजी उपोषणास बसणार असल्याचा इशारा बालासाहेब कोल्हे यांनी दिला आहे.

### '...प्रसंगी आत्महत्याही करू'


अंगद कोल्हे

सदर जमीन संपादित झाल्याने आम्हाला उपजीविकेचे कोणतेही साधन नसल्याने उदरनिर्वाहासह मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न बिकट झाला आहे. जर शासनाने मावेजा संदर्भात गंभीर विचार केला नाही तर प्रसंगी आत्महत्याही करू, असा इशाराही निवेदनात देण्यात आलेला आहे. या संपूर्ण प्रकरणाची जबाबदारी उपविभागीय अधिकारी माजलगाव यांची राहिल असा इशारा अंगद कोल्हे यांनी दिला आहे.

# रस्त्यासाठी सावरगावात रस्ता रोको

▶ प्रतिनिधी

माजलगाव : हॅम प्रोजेक्ट अंतर्गत बागपिंपळगाव ते सुर्डी प्रमाणेच सुर्डी ते सावरगावपर्यंत रस्त्याचे काम करण्यात यावे या मागणीसाठी गुरूवारी सावरगाव येथे रस्ता संघर्ष समिती व सर्वपक्षीयांच्या वतीने रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.

सुर्डी ते सावरगाव या रस्त्याची दयनीय अवस्था झालेली आहे. वास्तविक पाहता हॅम प्रोजेक्ट अंतर्गत हा बागपिंपळगाव ते सुर्डी या रस्त्याचे काम पूर्ण झालेले आहे. परंतु सुर्डी ते सावरगाव या रस्त्याचे काम अद्यापही झालेले नाही.

त्यामुळे या रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या वाहनधारकांना याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे रस्ता संघर्ष समिती व सर्वपक्षीयांच्या वतीने सावरगाव येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. तर मतदारसंघाचा लोकप्रतिनिधी म्हणून आंदोलनात सहभागी झालो. रस्ता लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी नव्याने प्रस्ताव दाखल करण्यात आला आहे. यासाठी सार्वजनिक बांधकाम मंत्री अशोक चव्हाण यांच्याकडे पाठपुरावा करून या रस्त्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे आमदार प्रकाश सोळंके यांनी सांगितले.

# दत्ता कांबळेंचा दिल्लीत हल्लाबोल

▶ प्रतिनिधी

नवी दिल्ली : अनुसूचित जाती, जमातींवरील वाढत्या अन्याय अत्याचारानिषेधार्थ नवी दिल्लीतील जंतरमंतर मैदानावर पुकारलेल्या हल्लाबोल आंदोलनात देशभरातून काँग्रेसच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांचा आवाज घुमला. त्यात काँग्रेसच्या अनुसूचित जाती विभागाचे बीड जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे यांनी सहभाग घेतला.



अखिल भारतीय काँग्रेस अनुसूचित जाती विभागाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे मंत्री डॉ.नितिन राऊत यांच्या नेतृत्वाखाली संसद भवन घेराव हल्लाबोल आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात काँग्रेसचे नेते राहुल गांधी आवर्जून उपस्थित राहून देशभरातून आलेल्या अनुसूचित जाती जमातीतील कार्यकर्त्यांच्या आंदोलनास संबोधित करून आंदोलनास पाठिंबा दिला. या संसद भवन घेराव हल्लाबोल आंदोलनास काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा काँग्रेस अनुसूचित जाती विभागाचे राष्ट्रीय समन्वयक रविंद्र दळवी यांच्या मार्गदर्शनखाली, प्रदेशाध्यक्ष विजय अंभोरे यांच्या नेतृत्वात काँग्रेस अनुसूचित जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे हे आपल्या जिल्हाभरातील प्रमुख कार्यकर्त्यांसोबत दिल्ली येथील आंदोलनात सहभागी झाले होते. यावेळी जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे यांनी, दलितो पर अन्याय रहेगा, धरती पर तूफान उठेगा, बोल दलिता हल्लाबोल, काँग्रेस जिंदाबाद, राहुल गांधी जिंदाबाद, जय भीम जय भीम, बलात्कारी को फाशी दो या घोषणांनी आंदोलन परिसर दणाणून सोडला. या आंदोलनात राज्याचे प्रभारी मनोज बागडी, कार्याध्यक्ष जितेंद्र देहाडे, कार्याध्यक्ष गौतम अरखडे, काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष प्रशांत पवार, सह राज्यभरातील पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# घरकूल लाभार्थींचे अनोखे आंदोलन

## तहसिल प्रशासनाच्या निषेधार्थ तोंडाला फासले काळे

▶ प्रतिनिधी

माजलगाव : रमाई आवास योजना, प्रधानमंत्री आवास योजना, शबरी आवास योजनेतील लाभार्थ्यांना घरकूल बांधण्यासाठी मोफत ५ ब्रास वाळू झीरो रॉयल्टीप्रमाणे उपलब्ध करून देणे बाबतचे लेखी आदेश बीड जिल्हाधिकारी यांनी २६ जूलै रोजी माजलगाव येथील तहसिलदारांना काढले होते व त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात यावी असे नमूद केले परंतु तहसिलदार यांनी उपरोक्त आदेशाला अनुसरुन कोणत्याही आरक्षित वाळू घाटा बाबतीत अहवाल वेळेत जिल्हाधिकाऱ्यांना पाठवला नसून योजनेतील लाभार्थी वंचित राहत असल्याने येथील तहसिलदार यांच्या निषेधार्थ बहुजन



समाज पार्टीचे बीड जिल्हाध्यक्ष ॲड.अमोल डोंगरे यांच्या नेतृत्वाखाली सदर योजनेच्या लाभार्थ्यांनी तोंडाला काळे फासून अनोखे आंदोलन उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर शुक्रवार, दि.१३ ऑगस्ट रोजी केले.

लाभार्थ्यांच्या संख्येच्या अनुषंगाने तहसिलदार यांनी सदरील लाभार्थी बांधकाम करित असलेल्या घराच्या जवळ असलेल्या पर्यावरण विषयक मंजुरी प्राप्त वाळू घाटातून वाळू उत्खननाची परवानगी ७ दिवसांच्या आत द्यावी, त्यापोटी तहसिलदारांनी अशा लाभार्थ्यांच्या यादीसाठी एकत्रित आदेश पारित करावे, असे आदेश असतांना तहसिलदार यांनी कोणतीही ठोस भूमिका न घेता जिल्हाधिकारी यांच्या आदेशाला केराची टोपली दाखवली असल्याने उपरोक्त योजनेतील लाभार्थ्यांना योजनेपासून वंचित ठेवण्याचे काम तहसिलदार यांनी केले असल्याने शासन अधिसूचने अन्वये प्र.क्र.९२ दि.१७ नोव्हेंबर २०१८ रोजीच्या तरतुदीनुसार वाळू गट आर्थिक दुर्बल घटक यांच्या करिता असलेल्या शासनाच्या गृहनिर्माण योजने अंतर्गत राखीव ठेवण्या बाबतची मागणी यावेळी उपविभागीय अधिकारी यांच्याकडे बहुजन समाज पार्टीचे बीड जिल्हा अध्यक्ष ॲड.अमोल डोंगरे यांनी केली. यावेळी विधानसभा अध्यक्ष अरविंद लोंढे, चंदनलाल बनगे, हरिभाऊ साळवे, सत्यपाल डोंगरे, रोहन किर्ते, बाळू कांबळे, अशोक घडसिंग, मोहन कांबळे, भारत डोंगरे, संदिपान साळवे, किशोर कांबळे, दयानंद साळवे यांच्यासह आंदोलनामध्ये सदर योजनेतील लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पान २ वरुन

### कोरोना लस : समज, गैरसमज

भारतातच नाही तर संपूर्ण जगभरात दिसून येतोय. इंग्लंडमधल्या इम्पेरियल कॉलेज ऑफ लंडनच्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या अहवालानुसार दोन्ही डोस घेतल्यावर कोविड होण्याचं प्रमाण ०.२ टक्के एवढे आहे. म्हणजेच दोन्ही डोस घेतलेल्या १००० लोकांपैकी फक्त २० लोकांना पुन्हा कोविड होतोय. तर १००० लोकांपैकी फक्त एका व्यक्तीला हॉस्पिटलमधे दाखल करावं लागतंय. असाच एक अहवाल ऑस्ट्रेलिया देशातून आलाय. त्यात असं दिसून आलंय की, ८० वर्षांवरील व्यक्तीने लसीचा एकही डोस घेतला नाही आणि त्याला कोविड झाला तर त्याला हॉस्पिटलमधे दाखल करण्याची शक्यता ९९ टक्के आहे, तर त्यांच्या मृत्यूचं प्रमाण ३२ टक्के एवढंय ७० वर्षांखालील व्यक्तींचे मृत्यूचे प्रमाण १४ टक्के, ६० वर्षांखालील व्यक्तींच्या मृत्यूचे प्रमाण ३ टक्के आणि ५० वर्षांखालील व्यक्तींचे मृत्यूचे प्रमाण फक्त १ टक्के एवढेच आहे. याउलट जर ८० वर्षांवरील व्यक्तीने लसीचे दोन्ही डोस घेतले असतील तर त्यांच्या मृत्यूचे प्रमाण हे १ टक्क्यापेक्षा कमी आहे आणि तरुण लोकांच्यात तर हे शून्यच आहे.

घाबरायचं कशासाठी?

जगभरात अजून एक सर्वसामान्य स्थिती दिसून आलीय. ती म्हणजे लस ही काही १०० टक्के कोविड रोखणारा उपाय नसून त्याच्याबरोबर इतर उपायही करावे लागतायत. मुळातच लस ही एखाद्या व्यक्तीच्या रोगप्रतिकारक शक्तीला वायरसविरुद्ध अँटिबॉडीज तयार करण्यासाठी उत्तेजित करतात. या अँटिबॉडीज लसीसाठी विषाणू किंवा रोगजनकांच्या विरुद्ध असतात आणि शरीराला संसर्ग होण्याआधीच लढा देण्यास आणि गंभीर रोग रोखण्यास कारणीभूत ठरतात.

काही लोकांमधे लसीला पुरेशी प्रतिकारशक्ती नसेल आणि वायरसच्या संपर्कात आल्यास अजूनही कोविडची लागण होण्याची शक्यता दिसून येतेय. एखादी व्यक्ती लसीला कसा प्रतिसाद देते यावर अनेक वेगवेगळ्या घटकांचा परिणाम होतो. यामधे त्या व्यक्तीचे वय, लिंग, औषधे, आहार, व्यायाम, आरोग्य आणि तणाव पातळी यांचा समावेश आहे. भारतामधील शास्त्रीय अभ्यासातून तयार झालेली माहिती अजून समोर आली नाही. तरी लसीचे दोन्ही डोस घेतलेल्या व्यक्तींना कोविड होण्याचे प्रमाण कमी असून त्यांच्या मृत्यूचे प्रमाण अतिशय नगण्य आहे. त्यामुळे लोकांनी घाबरून जाण्याची गरज नाही.

मुलांच्या लसीकरणाचं काय?

सध्या अजून एका प्रश्नाची सर्वत्र चर्चा असून त्याचं उत्तर सापडणं अवघड झालंय. हा प्रश्न म्हणजे लहान मुलांच्या लसीकरणाचं करायचं काय? ते कधी सुरू होणार? झालं तर कोणत्या वयोगटाला आधी मिळणार आणि ते नक्की किती दिवस चालणार? मुलांसाठी वेगळी लस तयार करावी लागणार का? सध्या मोठ्या व्यक्तींना ज्या लस दिल्या जातायत त्याच लसींच्या क्लिनिकल ट्रायल्स ६ ते १२ या वयोगटातील मुलांवर चालूयत. पण नक्की कधीपर्यंत त्याची माहिती जाहीर केली जाईल, हे मात्र सांगता येत नाही. तसंच लहान मुलांसाठी नवीन लस विकसित करावी लागणार नाही. आहे त्याच लसी कमी-अधिक प्रमाणात मात्रा देऊन उपयोगी ठरतील. सर्वात महत्त्वाचं म्हणजे लहान मुलांची प्रतिकारशक्ती अतिशय वेगाने विकसित होत असते. नैसर्गिक वातावरणात वाढणार्या मुलाला जन्मापासून त्याच्या वयाच्या चौथ्या वर्षापर्यंत ४००० प्रकारच्या वेगवेगळ्या जीवजंतूंचा आक्रमणाला सामोरे जावं लागतं. त्यामुळे त्यांची प्रतिकारशक्ती ही तुलनेने मोठ्या व्यक्तींपेक्षा फारच मजबूत असते. त्यामुळेच संपूर्ण जगात लहान मुलांना कोविड होण्याचे प्रमाण अतिशय नगण्य आहे.

ट्रायलविना लस

संपूर्ण इंग्लंडमधे फक्त एका लहान मुलाचा कोविडमुळे मृत्यू झाला. संपूर्ण ब्रिटनमधल्या सगळ्या शाळा गेले वर्षभर नियमितपणे सुरूयत. त्यामुळे लहान मुलांना अतिशय कमी वेळेत कोविडची लस देण्याची शक्यता सध्या तरी कमी आहे. जगात फक्त कॅनडामधेच फायजर या कंपनीची लस लहान मुलांना दिली जातेय. पण, या कंपनीने अशा प्रकारच्या क्लिनिकल ट्रायल केलेल्या नाही. त्यांच्या ट्रायल आत्ता सुरू आहेत. त्याची परिणामकारकता आणि मुलांवर होणारे इतर परिणाम याची माहिती अजून जाहीर केली नाही. कॅनडा सरकारने मुलांना लस देण्याचा कार्यक्रम सुरू ठेवला असून त्याची मात्रा मोठ्या व्यक्तींना दिल्या जाणार्या डोसइतकीच आहे. भारतातही अशा प्रकारच्या शक्यता पडताळून पाहिल्या जातायत. पण, कोणत्याही क्लिनिकल ट्रायल्स न घेता किंवा त्यांचे परिणाम जाहीर न करता लहान मुलांचं लसीकरण सुरू केलं तर आणखीनच गोंधळ वाढण्याची शक्यता आहे. जगभरातील परिस्थितीचा विचार केला असता असं दिसून येतं की लहान मुलांच्या लसीकरणाची गरज भासणार नाही.

# कोरोनाबाबत निष्काळजीपणा नको

## आढावा बैठकीत पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या सूचना

▶ प्रतिनिधी

बीड : मागील वर्षी लॉकडाऊनमध्ये सक्षम कार्यवाही झाली व आपण कोरोनाला रोखू शकलो, सध्या मोठ्या प्रमाणात नागरिक मास्क वापरत नसून निष्काळजीपणा मुळे रूग्ण संख्या कमी होत नाही. ग्रामीण व शहरी भागात कडक कारवाई होण्याची गरज आहे, असे प्रतिपादन राज्याचे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी केले आहे.

जिल्ह्यातील कोरोना लसीकरण परिस्थिती तसेच कृषी, भूसंपादन, महावितरण आदी विषयी पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय आढावा बैठक झाली. याप्रसंगी पालकमंत्री धनंजय मुंडे बोलत होते. बैठकीसाठी आमदार प्रकाश सोळंके, आमदार संदीप क्षीरसागर, आमदार बाळासाहेब आजबे, आमदार संजय दौंड, जिल्हाधिकारी राधाबिनोद शर्मा, जिल्हा पोलीस अधीक्षक आर.राजा, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अजित कुंभार यांसह विविध विभागातील प्रमुख अधिकारी उपस्थिती होते. कोरोना संसर्गाच्या तिसऱ्या लाटेचा धोका देशापुढे असून जगातील अनेक देशांमध्ये लसीकरण होऊन देखील तिसरी लाट आली आहे. पहिल्या आणि दुसऱ्या लाटेपेक्षा यामध्ये जास्त रूग्ण संख्या वाढण्याची शक्यता आहे.

यासाठी पूर्वतयारी करताना केंद्र सरकारने सर्व राज्यांना ऑक्सिजनसाठी स्वयंपूर्ण होण्याच्या सूचना दिल्या असून संसर्गाच्या लाटे दरम्यान केंद्राकडून ऑक्सिजन उपलब्ध होऊ शकणार नाही. आपल्या बीड जिल्ह्यात देखील यादृष्टीने सध्या असलेल्या क्षमता वाढविण्यासाठी प्रस्तावित ऑक्सिजन प्रकल्प तातडीने पूर्ण होणे गरजेचे आहे.



### 'खाजगी रूग्णालयांचे ऑडिट तातडीने पूर्ण करा'

कोविड उपचारांसाठी ज्या खाजगी रूग्णालयांना महात्मा फुले योजना लागू करण्यात आली होती, तेथे मोफत उपचार झाले नसल्यास प्रशासनाने त्याबाबतचा अहवाल आणि केलेल्या कारवाईची माहिती सादर करण्याचे निर्देश मंत्री धनंजय मुंडे यांनी दिले. हे ऑडिट तातडीने पूर्ण करून रूग्णालय निहाय लेखी स्वरूपात सादर करावेत असेही मंत्री मुंडेंनी स्पष्ट केले आहे.



# महात्मा फुले कर्जमुक्ती योजनेचा बाजार समितीच्या संचालकांना लाभ द्या

## सहकार मंत्र्यांना सभापती अशोक डक यांचे निवेदन

▶ प्रतिनिधी

मुंबई : शासनाने २०१९ साली महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना जाहीर केली आहे. या योजनेतून बाजार समितीचे संचालक व जिल्हा स्तरावरील संस्थांचे संचालक यांना वगळण्यात आले आहे. त्यांना या योजनेत सहभागी करून घ्यावे, अशी मागणी पणन व सहकार मंत्री बाळासाहेब पाटील यांच्याकडे निवेदनाद्वारे मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अशोक डक यांनी केली आहे.

महात्मा ज्योतिराव फुले कर्जमुक्ती योजना शासनाने २०१९ मध्ये राज्यात जाहीर केली आहे. या योजनेतून बाजार समितीचे संचालक व जिल्हास्तरावरील सहकारी संस्थांचे संचालक यांना वगळण्यात आले आहे. सहकारी संस्थावर निवडून येणारे संचालक हे मोठ्या प्रमाणावर अल्पभूधारक आहेत. त्यामुळे अशा घटकांना विषयांकीत कर्जमाफी योजनेतून वगळणे हे अन्यायकारक असल्याची भावना सदर पदाधिकारी वर्गात निर्माण झाली आहे. तरी या योजनेचा लाभ या संचालक मंडळाला व्हावा, अशी मागणी मुंबई बाजार समितीचे सभापती अशोक डक यांनी राज्याचे पणन व सहकार मंत्री बाळासाहेब पाटील यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

### युवासेनेचे वरूण सरदेसाई यांचा सत्कार



बीड : युवासेनेचे राष्ट्रीय सचिव वरूण सरदेसाई यांचा जिल्हा दौऱ्यावर आले असता माजलगाव युवासेनेच्या वतीने सत्कार करण्यात आला. याप्रसंगी शुभम डाके, सुरज एखंडे, सचिन दळवी, युवासैनिक आदी.


## नियमबाह्य कामे करणाऱ्या सरपंच, ग्रामसेवकांना दणका

# गटविकास अधिकाऱ्यांनी बजावल्या नोटीसा

▶ प्रतिनिधी

माजलगाव : बीड जिल्ह्यात सन २०१०-२० या कालावधीत नरेगा योजनेत नियमबाह्य कामे करून गैरव्यवहार केल्याप्रकरणी तालुक्यातील ५५ ग्रामसेवक, ४९ सरपंचांना गटविकास अधिकाऱ्यांनी नोटिसा बजावल्या असून, त्यामुळे अनेकांनी धास्ती घेऊन अंथरूण धरले आहे.

ग्रामीण भागातील विकासकामे राबवण्यासाठी शासनाकडून सुरू असलेल्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण हमी योजना २०१० पासून सुरू आहे. मात्र, या योजनेचा गैरफायदा घेऊन ती राबविल्याने त्याच्या लेखा परीक्षण अहवालात गंभीर त्रुटी आढळून आल्या होत्या. परंतु, त्याकडे जिल्हाधिकारी जगताप यांनी दुर्लक्ष केले. याबाबत न्यायालयाने गंभीर दखल घेतली व दिरंगाई करणाऱ्या जिल्हाधिकारी जगताप यांची त्वरित बदली करून प्रकरणात चौकशी करण्यात यावी, असे आदेश दिले. त्यावरून नरेगा कामातील संबंधित गावातील तत्कालीन ग्रामसेवक, सरपंच यांना गटविकास अधिकाऱ्यांच्यामार्फत नोटीसा बजावण्यात येत आहेत. माजलगाव तालुक्यातील ५५ ग्रामसेवक, ४९ सरपंचांना लेखापरीक्षण अहवालातील गंभीर त्रुटीबाबत विविध प्रकारच्या कारणांसाठी कारणे दाखवा नोटिस बजावली आहे. तीन दिवसांत समाधानकारक खुलासा सादर न केल्यास कार्यवाही करण्याचा इशारा या नोटीसमध्ये दिला आहे. दरम्यान, मागील दहा वर्षांच्या काळात अनेक ग्रामसेवक निवृत्त झाले तर काही मयत झाले आहेत. ज्यांना नोटीस बजावली आहे त्यापैकी अनेकांनी कार्यवाही होणार, अशी धास्ती घेतली आहे.


















आधुनिक विचारांचे वर्तमान
हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि **संपादक : भगीरथ गौरीशंकर तोडकरी,** यांनी तुळजा भवानी पब्लिकेशन ,माजलगाव ता.माजलगाव जि. बीड 431131 (महाराष्ट्र) येथे छापून आधुनिक विचारांचे वर्तमान कार्यालय, 23,मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव ता.माजलगाव जि.बीड येथे प्रसिद्ध केले. ईमेल : vartmaneditor@gmail.com भ्रमणध्वनी : **9423209823** RNI : MAHMAR/2018/76928, अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, लेख, व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद माजलगाव न्यायालय अंतर्गत) Postal REG No : L/92/RNP/Beed/2020-2022.

# विकासाभिमुख नगराध्यक्ष शेख मंजूर

## अल्पावधीत विकासाच्या ट्रॅकवर माजलगाव शहर

**माजलगाव नगरपरिषदेचे विद्यमान नगराध्यक्ष शेख मंजूर चाँदसाहब हे अल्पावधीत विकासाभिमुख नेतृत्व म्हणून पुढे येत आहेत. पदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर आजपर्यंत माजलगाव शहराच्या विकासासाठी करोडो रूपयांचा निधी खर्च केला. मुलभूत प्रश्नांसह शहरातील रस्ते चकाचक झाली आहेत. अल्पावधीत माजलगाव शहर विकासाच्या ट्रॅकवर आणण्याचे महत्वपूर्ण काम नगराध्यक्ष शेख मंजूर यांच्या हातून होत आहे. त्यानिमित्ताने शेख मंजूर यांच्या कार्यपद्धतीवर वर्तमानने टाकलेला हा प्रकाशझोत.**

**निमित्त**

**भगीरथ तोडकरी**





माजलगाव तालुक्यातील नाकलगाव येथे शेतकरी कुटुंबात नगराध्यक्ष शेख मंजूर यांचा जन्म झाला. वडिल चाँदसाब यांचा कपड्यांचा व्यवसाय होता. मुलांना शिक्षण भेटले पाहिजे. या उद्देशाने माजलगाव शहरात मुलांच्या शिक्षणासाठी आले, शेख मंजूर यांनी श्री सिध्देश्वर विद्यालयातून शिक्षण घेतले. या शिक्षणाच्या शिदोरीवर आमदार प्रकाश सोळंके यांच्या नेतृत्वाखाली राजकीय मार्गक्रमण करत माजलगाव नगरपालिकेचे नगराध्यक्षपद आज भुषवत अल्पवेळेत शहरवासीयांची स्वप्नपूर्ती करणारा नगराध्यक्ष म्हणून त्यांनी आगळी वेगळी ओळख निर्माण केली आहे.

नगराध्यक्ष शेख मंजूर चाँदसाब आवाहन यांनी शिक्षणापासूनच संघर्षमय सुरूवात केली. माजलगाव साखर कारखान्यात उत्पादन विभागात नोकरी करण्यास सुरूवात केली. यानंतर १९९५ ला प्रकाश सोळंके मित्र मंडळाची स्थापना करत सायकल रॅली काढली. आमदार प्रकाश सोळंके यांना मतदारांची साथ आणि समर्थन मिळावी यासाठी ग्रामीण भागामध्ये या मित्रमंडळाच्या माध्यमातुन काम करण्यास सुरूवात केली. यानंतर कापूस खरेदीच्या व्यवसायाला सुरूवात काळेगावथडी येथील मित्र बाळासाहेब तौर यांच्यासोबत करण्यात आली.

२००४ पर्यत हा व्यवसाय केला. यानंतर २०११ला शहरातील ईदगाह मौहल्ला येथून राष्ट्रवादी काँग्रेसकडून निवडणूक लढविली. अल्पशा मतांनी पराभव झाला परंतू खचून न जाता राजकारणाच्या माध्यमातुन वंचित, उपेक्षित घटकातील लोकांसाठी काम करण्याची संधी मिळाली नाही म्हणून समाजकारणाच्या माध्यमातून काम करण्यास सुरूवात केली. मुस्लिम समाजातील गरजू, गरिब कुटुंबातील मुला–मुलींचे विवाह आर्थिक अडचणींमुळे थांबू नयेत या उद्देशाने २०१३ साली मुस्लिम धर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन करत २४ जोडप्यांचे विवाह स्वखर्चातून लावून देण्यात आले. क्रिकेट स्पर्धेने आयोजन असो किंवा शहरामध्ये विविध स्पर्धाचे आयोजन असो यासह अडचणींत असलेल्यांना सातत्याने मदत करत सामाजिक कार्य अविरतपणे सुरू ठेवले. नगराध्यक्षपदाची निवडणूक लढविण्याच्या दृष्टीने सर्वच प्रभागामध्ये जनसंपर्क निर्माण केला. २०१६ ला थेट जननेतुन निवडणूक होणार असल्याने युवकांचेही मोठे संघटन निर्माण केले. परंतु ऐनवेळी नगराध्यक्षपदाची उमेदवारी मिळाली नाही. प्रभाग क्रमांक अकरा मधून राष्ट्रवादी काँग्रेसकडून नगरसेवक पदाची उमेदवारी मिळाली. सर्वाधिक मते मिळवत या प्रभागातून नगरसेवक म्हणून विजयी होण्याचा बहुमान मिळविला.परंतु पालिकेमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसची सत्ता आली नाही, तीन वर्षे विरोधी पक्षाची भूमिका बजावली. येथील पालिकेमध्ये तत्कालिन नगराध्यक्ष व तत्कालिन मुख्याधिकाऱ्यांवर गैरव्यवहार प्रकरणी गुन्हे दाखल झाले.

रिक्त झालेल्या पदाकरीता नगरसेवकांतुन नगराध्यक्ष निवडण्यासाठी निवडणूक प्रक्रिया झाली. आमदार प्रकाश सोळंके यांनी शेख मंजूर यांच्या नावावर शिक्कामोर्तब केल्याने नगराध्यक्ष पदाची माळ शेख मंजूर यांच्या गळ्यात ९ नोव्हेंबर २०२० ला पडली. नगराध्यक्ष पदाची संधी मिळताच या संधीचा सोने करत शहरातील रखडलेली विकासकामे सर्व सन्माननिय नगरसेवकांच्या सहकार्याने अल्पवेळेत मार्गी लावण्याचा सपाटाच शेख मंजूर यांनी लावला. पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत ३४१ लाभार्थींना दोन कोटी सोळा लाख रूपयांचे वाटप करण्यात आले. शहरामध्ये छत्रपती शिवाजी महाराज चौक ते बी ॲण्ड रोड हा मागील पंधरा वर्षापासून रखडलेला रस्ता तसेच डॉक्टर लेनमधील रस्ता, एचडीएफसी बँक ते मंजरथ रोड हा रस्ता, एमएसईबी कार्यालय ते छत्रपती शिवाजी विद्यालयापर्यतचा रस्ता यासह ११ कोटी रूपये खर्चून ७५ रस्त्याने सिमेंटीकरण करण्यात आले. तर लवकरच नऊ कोटी रूपयांचे ६० सिमेंट रस्ते सर्वच प्रभागामध्ये होणार आहेत. शहरातील सर्वच प्रभागामध्ये पथदिवे बसवून शहर प्रकाशमय केले आहे. विकासाचा नवा मापदंड शेख मंजूर यांनी निर्माण केला आहे. त्यांची नगराध्यक्ष पदाची वाटचाल माजलगाव शहराला दिशा देणारी ठरणार आहे.

### प्रशस्त इमारतीचे ऐतिहासिक लोकार्पण



माजलगाव नगर परिषदेचे नगराध्यक्ष शेख मंजूर चाँदसाहब यांनी अवघ्या १० महिन्यांच्या कालावधीमध्ये बोलणे कमी आणि काम करणे अधिक हे तत्व अंगीकारून शहरवासियांना स्वच्छता, पिण्याचे पाणी, लाईट या मुलभूत योग्य सुविधा दिल्या आहेत. तसेच शहरातील एकूण १ ते १२ प्रभागात कोट्यावधी रूपयांचे दर्जेदार सिमेंट रस्ते, नाल्या, पाईपलाईन ही विकासकामे केली. गेल्या अनेक वर्षापासूनचा आठवडी बाजाराच्या जागेचा प्रश्नही मार्गी लागत आहे. त्याच बरोबर शहरात सांस्कृतिक नाट्यगृह, मराठा भवन, आर्यवैश्य भवन यासाठी जागा उपलब्ध करून दिली. तसेच शहरात वृक्षारोपणाचा कार्यक्रम मोठ्या प्रमाणात होणार आहे. या सर्व शहरातील विकास कामांबरोबर शहराच्या वैभवात भर टाकणारी नगर पालिकेच्या ईमारतीचे काम तटवल १२ वर्षापासून रेंगाळत पडलेले होते. या ईमारतीचे काम अवघ्या २ ते ३ महिन्यामध्ये जलदगतीने करून सुसज्ज अशा या नगर परिषदेचा प्रशासकीय इमारतीचा लोकार्पण सोहळा देशाच्या ७५ व्या स्वातंत्र्यदिनाचे औचित साधून पार पडत आहे. त्यामुळे माजलगावातील वचनपूर्ती करणारा नगराध्यक्ष शेख मंजूर हे असल्याची भावना नागरीकांमधून व्यक्त होत आहे. दरम्यान, प्रशस्त नगरपालिका इमारतीचे भारताच्या स्वातंत्र्यदिनी ऐतिहासिक लोकार्पण होत आहे. हा दुग्धशर्करा योग माजलगावकर अनुभवत आहेत.



## नगरपालिकेच्या नुतन वास्तूला सभापती अशोक डक यांनी दिली भेट

▶ प्रतिनिधी

माजलगाव : येथील नगरपालिकेच्या नुतन इमारतीचा शुभारंभ आज स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून होणार आहे. या नगरपालिकेच्या नुतन इमारतीच्या नवीन वास्तूची मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अशोक डक यांनी सदिच्छा भेट दिली. याप्रसंगी नगराध्यक्ष मंजूर शेख, जिल्हा परिषद सदस्य चंद्रकांत शेजुळ, बाजार समितीचे उपसभापती अच्युतराव लाटे, पंचायत समितीचे माजी सभापती जयदत्त नरवडे, नगरसेवक नारायण होके पाटील, शेख इम्रान, शकील कुरेशी आदींची उपस्थिती होती. यावेळी सभापती अशोक डक, चंद्रकांत शेजुळ, जयदत्त नरवडे यांचा नगराध्यक्ष मंजूर शेख यांनी यथोचित सत्कार केला.

## ‘बेकायदा वराई, हमाली वसुली थांबवा’

▶ प्रतिनिधी

माजलगाव : बेकायदा सुरू असलेली वराई, हमाली वसुली त्वरित थांबवा अशा आशयाचे निवेदन प्रशासनाकडे माजलगाव ट्रान्सपोर्ट संघटनेने दिले आहे. दरम्यान, हा प्रकार थांबला नाही तर चक्का जाम आंदोलन आंदोलन छेडले जाईल, असा इशारा संघटनेने दिला आहे.

माजलगाव येथील ट्रकचालक व मालक यांच्याकडून त्यांचा माल भरण्यासाठी उतरण्यासाठी हमाली व वराई ही बेकायदा आव्वाच्या सव्वा घेतली जात आहे. ही बेकायदा वसुली तात्काळ थांबवा या मागणीसाठी येथील ट्रान्सपोर्ट संघटनेने तहसिलदार, शहर पोलिस निरीक्षक, कृषी उत्पन्न बाजार समिती, व्यापारी महासंघास निवेदन दिले.






# माजलगावात 'जिओ डिजीटल मार्ट'चे लाँचिंग

## नाविन्यपूर्ण ईलेक्ट्रानिक्स उपकरणांचे दालन खुले

▶ प्रतिनिधी

माजलगाव : ग्राहकांना नाविन्यपूर्ण ईलेक्ट्रानिक्स उपकरणे उपलब्ध करून देण्यासाठी रिलायन्स ग्रुपने देशभरात सुरू केलेल्या जिओ डिजीटल मार्टच्या दालनाचे माजलगावस्थित छत्रपती संभाजी महाराज चौक येथे लाँचिंग करण्यात आले. बीड जिल्ह्यातील या पहिल्या जिओ डिजीटल मार्टचा शुभारंभ शुक्रवार, दिनांक १३ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता वर्तमान माध्यम समुहाचे मुख्य संपादक भगीरथ तोडकरी यांच्या हस्ते करण्यात आला.

या शुभारंभाप्रसंगी जिओ केंद्रीय व्यवस्थापक धिरज सिन्हा, सौरभ महाजन, गणेश भाळशंकर, विठ्ठल गवळी, ज्ञानेश्वर शिंदे, उबेद इनामदार, शेख नदीम, दत्ता सोनटक्के, रणवीर काबला आदी मान्यवरांची उपस्थिती होती. रिलायन्स ग्रुपने देशभरात ईलेक्ट्रानिक्स उपकरणांच्या नाविन्यपूर्ण ऑनलाईन शॉपिंगचे दालन खुले केले आहे. जिओ डिजीटल मार्टमुळे ग्राहकांना ईलेक्ट्रानिक्स उपकरणे खरेदी करणे सहज आणि सोपे होईल. बीड जिल्ह्यातील पहिल्या जिओ डिजीटल मार्टचे माजलगावात दालन उभे राहीले. यामुळे माजलगाव शहर, परिसर आणि तालुक्यातील ग्राहकांना ईलेक्ट्रानिक्स उपकरणे खरेदी करणे सोपे जाईल. या दालनामध्ये ऑनलाईन उपकरणे खरेदीवर भरघोस सूट देण्यात आलेली आहे. जेणेकरून ६० टक्क्यांपर्यंत आकर्षक सवलत मिळणार आहे, अशी माहिती धिरज सिन्हा यांनी दिली.

### जिओ डिजीटल मार्ट पसंतीस उतरेल : भगीरथ तोडकरी



जिओ डिजीटल मार्टच्या शुभारंभप्रसंगी बोलताना भगीरथ तोडकरी म्हणाले, या ईलेक्ट्रानिक्स दालनामुळे दर्जा आणि गुणवत्ता जपणारी उपकरणे ग्राहकांना उपलब्ध होतील. जिओ डिजीटल मार्टमुळे तरूणपिढी रिलायन्स ग्रुपशी जोडली जाईल. या दालनामध्ये विविध ब्रॅण्डेड कंपण्यांचे मोबाइल्स, लॅपटॉप्स, टेलिव्हिजन्स, एसी, वॉशिंग मशीन्स, रेफ्रिजरेटर्स आदी अत्याधुनिक उपकरणे उपलब्ध आहेत. त्यामुळे जिओ डिजीटल मार्ट पसंतीस उतरेल, असे गौरवोद्गार भगीरथ तोडकरी यांनी काढले.


स्वातंत्र्य दिन चिरायू होवो...
'वर्तमान'च्या तृतीय वर्धापनदिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!
• शुभेच्छुक •
ॲड.भानुदास डक
प्रमुख : स्थानिक नियोजन समिती
सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव
अध्यक्ष : गोविंद प्रतिष्ठाण, माजलगाव

स्वातंत्र्य दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !
आपली माणसं, आपला विकास
तुमच्या ठेवीवर खरी किंमत फक्त तुळजाभवानी मध्येच...
मुदत ठेवीवर आकर्षक व्याजदर
31 ते 90 दिवस — 7%
91 ते 180 दिवस — 7.50%
181 ते 365 दिवस — 8%
366 दिवसाच्या पुढे — 8.50%
विधवा, अपंग, जेष्ठ नागरीक व माजी सैनिक यांच्यासाठी 8.75% व्याजदर
आपली माणसं आपला विकास
तुळजाभवानी अर्बन मल्टीस्टेट को.ऑप.क्रेडीट सोसायटी लि.माजलगाव
मुख्य कार्यालय : स्वतभवन, जुना मोंढा, माजलगाव ता.माजलगाव जि.बीड ४३१ १३१ (महाराष्ट्र)
7774020401-470
www.tuljabhavaniurban.com
ho@tuljabhavaniurban.com
tumccsl_tuljabhavani_urban

गोल्ड लोन
प्रति तोळा 40000/-
▸ 0% प्रोसेसिंग फि
▸ १२% व्याजदर
▸ मासिक हप्त्यावर परतफेड
THE MARATHWADA URBAN
दि मराठवाडा अर्बन को.ऑप.क्रेडीट सोसायटी लि.माजलगांव
मुख्य कार्यालय : मथुराई कॉम्प्लेक्स, पंचवटी लस्सी कॉर्नर समोर, धारूर रोड, माजलगाव
Ph.:(02443)236236 / Mo.9168616143 | Email : marathwadaurban1099@gmail.com

अडचणीच्या काळात सोनं आहे ना, मग चिंता कशाला!
शेतकरी व व्यापारी बांधवांसाठी खास
गोल्ड लोन
प्रतितोळा 42000 रुपये
तात्काळ उपलब्ध
कमीत कमी व्याजदर, सोपी आणि जलद प्रक्रिया !
आजच आपल्या नजिकच्या शाखेशी संपर्क साधा व या सुवर्णसंधी चा लाभ घ्या !
100% कर्ज सुविधा
विशेष सुविधा
आपण घरबसल्या सुद्धा गोल्ड लोन मिळवू शकता.
श्री मंगलनाथ मल्टीस्टेट को-ऑप.क्रेडीट सोसायटी (महाराष्ट्र व कर्नाटक)
मुख्य कार्यालय : जुना मोंढा, माजलगाव ता.माजलगाव जि.बीड ४३१ १३१
7507949494, 7720061987
श्री.आर.जी.कानडे — संस्थापक अध्यक्ष
श्री.रविंद्र कानडे — मुख्य कार्यकारी अधिकारी
कार्यरत शाखा
मुख्य कार्यालय 7720061987 | माजलगाव 7720061986 | मार्केट यार्ड 7720061981 | परळी 7720061982 | दिंद्रुड 7720061983
औरंगाबाद 7720061984 | कुं.पिंपळगाव 7720061989 | किट्टीआडगाव 7720061988 | जालना 7720061985 | टाकरवण 8380002195 | औरद 8380032074

स्वातंत्र्य दिन चिरायू होवो...
वर्तमानच्या तृतीय वर्धापनदिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा !
अंबाजोगाई सहकारी साखर कारखाना लि.
अंबासाखर ता.अंबाजोगाई जि.बीड ४३१ ५२३
Email : ambajogaissk@gmail.com
एस.बी.साखरे (कार्यकारी संचालक) | हाणमंतराव मोरे (व्हा.चेअरमन) | रमेश आडसकर (चेअरमन)
संचालक सर्वश्री
राजकिशोर मोदी, प्रा.वसंत चव्हाण, दाजीसाहेब लोमटे, अनंतराव पाटील, श्रीराम मुंडे, बब्रुवान खुळे, वसंतराव हारे, औदुंबर शिंदे, सुनिल शिंदे, अशोक गायकवाड, मारोती साळुंके, सौ.पुनम नांदवटे, ॲड.प्रमोद जाधव, शिवराम कदम, जनार्धन माने, तानाजी देशमुख, अजय ढगे (पाटील), तुळशीराम राऊत, निवृत्ती चेवले, सौ.सुमनबाई चौधरी व सर्व खाते प्रमुख, कर्मचारी वृंद